# बृहन्मुंबई महानगरपालिका

सआपीद / ओडी / 0322 / अति. निर्मू. दि. 01.09.2021

## जाहिर सुचना

विषय- अनधिकृत फेरीवाल्यांवर निष्कासनाची कारवाई करण्याकरिता कंत्राटी कामगार अशासकीय संस्था (एन.जी.ओ.) मार्फत पुरवठा करण्याबाबतची जाहीर सुचना.

सदर जाहिर सुचनेमार्फेत सर्व अशासकीय संस्थांना कळविण्यात येते की, पी/दक्षिण विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात असणा-या इच्छुक धर्मदाय आयुक्त व बृहन्मुंबई महानगरपालिकेत नोंदणीकृत असलेल्या स्थानिक अशासकीय संस्था, मजुर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था, औदयोगिक सेवा सहकारी संस्था या संस्थांकडुन माहे सप्टेंबर 2021 ते नोव्हेंबर 2021 या कालावधीकरिता अतिक्रमण निर्मुलन वाहनावर एकुण 10 कंत्राटी कामगार पुरविण्याकरिता मोहरबंद इच्छापत्र मागविण्यात येत आहेत.

सदर इच्छापत्राचा नमुना वरिष्ठ निरीक्षक अनुज्ञापन (अतिक्रमण निर्मूलन), बृहन्मुंबई महानगरपालिका पी/दक्षिण विभाग कार्यालय, एस.व्ही.रोड, जवाहर नगर, गोरेगाव (पश्चिम), मुंबई-400062 येथे 891 रूपयावर 5% वस्तु व सेवा कर आकारून (ना-परतावा) रोख स्वरूपात चलन काढून दि. 02.09.2021 ते दि. 09.09.2021 दिवशी सकाळी 10.30 ते दुपारी 01.00 वाजेपर्यंत विकत घेऊ शकतात तसेच आवश्यक कागदपत्रांसहित सिलबंद अर्ज दि. 09.09.2021 पर्यंत दुपारी 01.00 वाजेपर्यंत अनुज्ञापन खाते, पी/दक्षिण विभाग, पहिला मजला येथे सिलबंद पेटीत टाकावे. नमुद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर प्राप्त अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

लॉटरीची तारीख दि. 14.09.2021 रोजी दुपारी 03.00 वाजता निश्चित करण्यात आलेली आहे.

सही/- 01.09.2021

सहाय्यक आयुक्त पी/दक्षिण विभाग